आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ एप्रिल २०२४ - रविवार

देशाच्या विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभा होत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महाराष्ट्रातली पहिली प्रचारसभा उद्या चंद्रपुरात भाजपा उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्यासाठी होणार आहे. मोरवा विमानतळाजवळच्या १६ एकराच्या विस्तीर्ण परिसरात ही सभा होणार असून नरेंद्र मोदी सुमारे १० वर्षांनी चंद्रपूरमधे सभा घेणार आहेत. या सभेच्या दृष्टीनं भाजपातर्फे जय्यत तयारी होत असून सुरक्षा व्यवस्थाही ठेवण्यात आली आहे.

<><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगानं, महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी सामान्य आणि पोलीस अशा दोन श्रेणींमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात सेवानिवृत्त सनदी अधिकारी धर्मेंद्र एस गंगवार यांची सामान्य विशेष निरीक्षक आणि भारतीय पोलिस सेवेतले माजी अधिकारी एनके मिश्रा यांची पोलिस विशेष निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्याचं, आयोगानं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. हे विशेष निरीक्षक, कर्मचारी, सुरक्षा दलं आणि मतदान यंत्रांवर देखरेख ठेवतील. ते स्वत: राज्य मुख्यालयात थांबतील आणि आवश्यकता भासली तर संवेदनशील आणि जिथे समन्वयाची गरज आहे अशा भागांना भेट देतील.

<><><><>

लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना विविध परवानग्या मिळवण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या सुविधा या पोर्टलवर, गेल्या वीस

दिवसांमध्ये ७३ अर्ज उपलब्ध झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. प्रचारासाठी रॅली, हंगामी कार्यालयं सुरु करणं, प्रत्यक्ष भेटींनी घरोघरी जाऊन करायचा प्रचार, व्हिडिओ व्हॅन, हेलिकॉप्टर आदी बाबींसाठीच्या परवानग्या या पोर्टलवर उपलब्ध आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या धर्तीवर देण्यात येणाऱ्या या परवानग्यांसाठी ४४ हजार ६०० अर्ज मंजूर करण्यात आल्याचंही निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. या पोर्टल मुळे उमेदवारांच्या निवडणूक व्यवस्थापनात पारदर्शकताही राहणार आहे.

<><><><><>

बीड लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीनं अशोक हिंगे पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्याशिवाय नागपूरच्या रामटेक लोकसभा मतदार संघात अपक्ष उमेदवार-माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये यांना पाठींबा जाहीर केला असल्याचं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

मतदार जनजागृतीसाठी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्यावतीनं घेण्यात आलेल्या "रन फॉर वोट" या मतदान जनजागृती विषयक लोकशाही दौडमध्ये ६ हजार ३५९ नागरिक सहभागी झाले. या उपक्रमाची नोंद "आंतरराष्ट्रीय वंडर बुक ऑफ रेकॉर्ड"मधे झाली असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

पनवेल शहरात आज विविध माध्यमांतून, मतदार जनजागृती मोहीम राबवण्यात आली. विद्यार्थ्यांनी सायकल फेरी काढून, तसच जागोजागी

पथनाट्यं सादर करुन मतदानाचं महत्त्व समजावून दिलं. पनवेलच्या एका शाळेत तृतीय पंथीयांची बैठक आयोजित करुन त्यांनाही मतदानाचं महत्त्व सांगण्यात आलं.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण हिंगोली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ शहरात, व्हिडीओ गेमच्या नावाखाली जुगार चालवणार्या  ५ व्हीडीओ गेम पार्लर्स वर कुडाळ पोलिसांनी काल रात्री छापा टाकला. यावेळी खेळताना आणि त्या ठिकाणी काम करताना आढळलेल्या ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पार्लर्सच्या मालकांनाही आज ताब्यात घेतलं असून  या कारवाईत ४३ हजाराच्या रोख रक्कमेसह ४६ यंत्र मिळून ९लाख ६३ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यातल्या विविध संघटनांनी नोंदवलेल्या तक्रारीवरुन ही कारवाई करण्यात आली, असं पोलिसांनी स्पष्ट केलं आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ एप्रिल २०२४ - रविवार

**<><><><><>**

समृद्धी महामार्गावर वाशीम जिल्ह्यातल्या शेंदूरजना उड्डाणपुला जवळ तीन वाहनांचा अपघात होऊन ३ जण जखमी झाले. लासलगावहुन नागपूरकडे कांदा घेऊन जाणारा ट्रक सकाळी साडेपाच वाजता उड्डाणपुला समोर उलटला. त्यामुळे मागुन येत असलेल्या ट्रकनं अचानक ब्रेक दाबले. त्याचवेळी भरधाव वेगानं नाशिकहून नागपूरकडे द्राक्षं घेऊन जाणारी बोलेरो पिक गाडी अचानक थांबलेल्या ट्रकवर धडकली. गाडीचा चालक गंभीररीत्या जखमी झाला, तर ट्रक चालकालाही किरकोळ जखम झाली. जखमीना समृद्धी महामार्गावरील रुग्णवाहीकेच्या सहाय्यानं नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जागतिक स्तरावर आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी आजचा ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो.

**<><><><><>**

**<u>आयपीएल/डेस्क/आशुतोष</u>**

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत आज दोन सामने होणार असून पहिला सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन संघांमध्ये मुंबईच्या वानखेडे स्टेडियम इथे दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल. दुसरा सामना लखनौच्या एकाना सिटी इथल्या अटलबिहारी वाजपेयी स्टेडियमवर लखनौ सुपर जायन्ट्स आणि गुजरात टायटन्स या दोन संघांमध्ये रात्री साडेसात वाजता सुरू होईल.

**//<><><><><>//**